२ .

**परिपत्रक**

नंबर : कॉन/ एस. आर. ४२
पुणे, दिनांक : 23-७-६८

विषय :- जमीन एकत्रीकरण योजना
आपसात कबूली जबाब घेण्याबाबत.

सहायक एकत्रीकरण अधिकारी यांनी आपसांत संमतीने केलेल्या जमिनीच्या गटाबद्दल कबूली जबाब कसे घ्यावेत या बाबत या कार्यालयाकडील प. क्र. सम दिनांक १३. ८. ६५ रोजी काढलेल्या परिपत्रकातील परिच्छेद १(अ) (ब) (क) यात सूचना दिलेल्या आहेत. दौऱ्याचे वेळी घेतलेले कबूली जबाब पहाता खालील उणीवा आढळून आल्या.

१) खातेदारांनी आपसात कबूलीने जमिनींची अदलाबदल करून घेतली असली तरी जबाब घेतेवेळी ती एकत्रांत न घेता संबंधित खातेदारांचे अलग अलग जबाब घेतले आहेत.

२) काही विभागात जबाबात फक्त एकत्रीकरण योजनेत दिलेल्या जमिनींचाच उल्लेख केलेला आहे.

३) कमी जास्त क्षेत्राबाबत मोघम उल्लेख केलेला असतो.

४) संबंधित खातेदारातर्फे इतर खातेदारांची/ नातेवाईकांची सही / आंगठा घेतला जातो.

५) जबाब हे छापील नमुन्यात घेतले जातात.

वरील उणीवा दूर करून त्यात ~~एक सूत्रता~~ एकसूत्रता आणण्याच्या दृष्टीने खालील गोष्टी कटाक्षाने पाळाव्यात. कबूली जबाबात ज्या संबंधित खातेदारांच्या जमिनी समाविष्ट झाल्या आहेत अशा सर्व खातेदारांचे जबाब अलग न घेता अदलाबदलीचे खाली मधील सर्व खातेदारांचे जाणाऱ्या/येणाऱ्या जमिनींचा उल्लेख ( म्हणजेच नियम ९(३) व ९(४) ची स्थिती) प्रत्येक खातेदारांच्या नांवासमोर दाखवून त्यावर खालीतील सर्व संबंधित खातेदारांची सही/आंगठा घेणे जरूरीचे आहे. तथापि काही अपरिहार्य कारणामुळे एखादा खातेदार गैरहजर असल्यास

२....

त्यांच्यातर्फे सही करणाऱ्या / अंगठा देणाऱ्या इसमाजवळ त्याप्रमाणे अधिकारपत्र ( Letter of authority ) असावे व त्याची खात्री करूनच सदरच्या इसमास सही/अंगठा करण्यास संमती द्यावी व अशा गैरहजर खातेदारांना सहायक एकत्रीकरण अधिकारी यांनी जाणाऱ्या/येणाऱ्या जमिनींची माहिती लेखी कळवावी व त्याचा दाखला ठेवावा. एकत्रीकरण नियम ११(क) प्रमाणे जमिनींची अदलाबदल शक्यतो ज्या त्या जमिनींच्या प्रकारात करावी असे आहे. तथापि गट बांधणीचे काम करतेवेळी काही वेळा जिरायत/बागायत जमिनीचा मोबदला बागायत/जिरायत जमिनीत दिला जातो. त्यामुळे खात्यावर जमीन कमी/जास्त दिली जाते. अशावेळी ज्या जमिनींची अदलाबदल अशाप्रकारे केली जाते त्याचा स्पष्ट उल्लेख ( स. नं. /हि. नं. सह) जबाबात करावा. तसेच विहिरीतील सामाईक अगर स्वतंत्र हक्क झाडांचे हक्क याबाबतीत ज्यावेळी बदल केला असेल त्यावेळी त्याचा स्पष्ट उल्लेख असावा. राहती घरे शक्यतो बदलू नयेत. बदलल्यास त्याचे कारणाचा स्पष्ट खुलासा जबाबात ठेवावा. कबूली जबाब हे छापील नमुन्यात न घेता हस्तलिखितात घ्यावेत. तसेच जबाबाच्या पानांची संख्या १ पेक्षा जास्त असल्यास जबाबातील सर्व पाने एकत्रात टाचून प्रत्येक जोडावर संबंधित खातेदारांची/पंचांची सही यापुढे घेत जावी.

(सही) स. पी. कमरुद्दीन.
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख, पुणे.

प्रत : एकत्रीकरण अधिकारी (सर्व) यांच्या विभागांतील सर्व सहायक एकत्रीकरण अधिकारी यांच्या प्रतीसह माहितीसाठी व तजवीजीसाठी.

प्रत : प्रादेशिक उपसंचालक भूमि अभिलेख नागपूर/पश्चिम महाराष्ट्र मुंबई यांच्याकडे माहितीसाठी.

प्रत : भूमि अभिलेख (एकत्रीकरण), जमाबंदी आयुक्त पुणे यांच्या कार्यालयातील सर्व परिनिरीक्षण लिपिक यांच्याकडे माहितीसाठी.

<u>निर्गमित</u>

जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख, पुणे करिता.

ति-२२७६८